# दंगल

( एकांकिका )

-- चं. प्र. देशपांडे



# दंगल

**-- चं. प्र. देशपांडे.**

लेव्हल्स, मोडे यांचे नेपथ्य. कोणत्याही वस्तू प्रत्यक्षात न वापरता मूकाभिनयातून त्या दर्शवाव्या. ही एकांकिका मानसिक वास्तवाच्या रूपात जाणारी असल्याने अनैसर्गिक प्रकाश, त्रस्ततायुक्त संगीत तुकडे.

रगमंचावर समोर एक जखमी व्यक्ती बसून. इतकी बँडेजेस -- नव्याजुन्या कापडाच्या पट्टया बांधलेल्या की ती स्त्री आहे की पुरुष हे कळू नये. फक्त नाक, डोळे उघडे. ती व्यक्ती मधूनमधून पट्टया सोडणे,पुन्हा बांधणे असे करत राहते. चाललेल्या कृतीच्या अनुषंगाने पट्टी उभी लोंबकळत धरणे. आडवी घट्ट धरणे,. तीवर फुंकर मारणे किंवा खाली सोडून टाकलेली भराभरा गोळा करणे इत्यादी करत राहते.

श्रीकृष्ण आणि निशा ही दोघे पतिपत्नी असून ५०--४५ ची आहेत. पडदा उघडल्यावर समोर श्रीकृष्ण सिगरेट ओढत बसलेला, अर्थात सिगरेटचा मूकाभिनय.

श्रीकृष्ण : वैयक्तिक प्रश्न वैयक्तिक लेव्हलवर, कौटुंबिक प्रश्न कौटुंबिक लेव्हलवर, सामाजिक -- सामाजिक आणि देशाचे देशाच्या लेव्हलवर सोडवावे लागतात -- हाच एकूण शिक्षणाचा सारांश आहे. हे प्रश्न एकमेकांत मिसळू शकतात का किंवा ते कुठल्या लेव्हलचे आहेत हे नेहमीच सांगता येईल का -- याच्याशी कुणाला काही देणंघेणं नसतं. हे सुध्दा शिक्षण असं म्हणून मुद्दाम कुणी देत नाही. पण सगळेच आपोआप हे समजून असतात. म्हणजे नकळत शिक्षणच झालं ते ! ( मधूनमधून तो जखमी व्यक्तीकडे पाहून बोलतो -- ) आता माझ्या डोक्यात सतत एक व्दंव्द चालू असतं. अमुक अमुक घडावं आणि तमूक तमूक घडू नये -- असं त्याचं साधारण स्वरूप असतं. उदाहरणार्थ मला येणारी उव्दिग्नता. तिचा मला त्रास होतो. ती नको असं वाटतं. पण ती कुठल्या ना कुठल्या कारणांनी आलेली असते ना ! मग कारणं आहेत तशी ठेवायची आणि फक्त मलाच उव्दिग्नता नको म्हणजे मीच फक्त मरून जायचं -- असं होतं हे ! ( काही क्षण शांतता. मग -- ) पेपर वाचून झाला की नीट घडी करून ठेवायचा नाही -- कपाटातनं पुस्तक वाढताना उभं काढलं असेल तर ठेवताना आडवं ठेवायचं -- चहा घेऊन झाल्यावर चहाचा मग तसाच ठेवून बसून राह्यचं ! उठू तेव्हा उचलू म्हणून ! पुढं अर्धा तास उठायचंच नाही !

आणि नंतर अचानक आठवलेल्या कुठल्यातरी कामासाठी उठायचं आणि हे विसरूनच जायचं ! आणि समजा तो मग उचलायचं लक्षात आलं तर त्या मगाचा जो गोल डाग असतो तो नंतर पुसू म्हणून तसाच ठेवायचा ! पुढं तीन दिवस तो तसाच राहू द्यायचा ! आता हा डाग तरी का पडतो ? तर मगात चहा ओतताना अंदाज चुकलेला असतो आणि नंतर चहा यातला त्यात केलेला असतो आणि त्यामुळं मगावरनं ओघळ खाली गेलेला असतो. त्याचा डाग पडतो. मग त्या मगाखाली ठेवायच्या प्लास्टिकच्या चकत्या का वापरत नाही ? तर त्या चकत्या काढून आतून बाहेर आणायच्या आणि काम झाल्यावर पुन्हा नेऊन ठेवायच्या हे एक्स्ट्रॉ काम होतं ! चहा पिणं हे याच्याशिवायही होऊ शकतं ! म्हणून त्या चकत्या असूनही वापरायच्या नाहीत ! कंटाळा सगळा ! आळस आणि कंटाळा दोन्ही ! हे लोक सतत कुठल्यातरी तंद्रीत किंवा अर्धवट झोपेतच असतात ! बेशुध्द म्हटलं तरी चालेल ! हे सारखं बघून मला वैताग येतो. उव्दिग्न वाटतं. तर हा उव्दिग्नतेचा प्रश्न वैयक्तिक की सामाजिक ? मी जिवंत राहून मला ही उव्दिग्नता यायला नको म्हणजे मग समाजसुधारणाच करायला लागणार नं ! म्हणजे मुळात सामाजिकच सगळं ! म्हणून सतत सारखी क्रांती व्हायला हवीय !

( निशा तांदूळ निवडण्याचे ताट घेऊन येऊन बसते -- हाही अर्थातच मूकाभिनय.)

निशा: कसला एवढा गहन विचार चाललाय ? गहन विचार करणं हे आपलं काम नाही -- एवढं तरी खरं तर तू लक्षात घ्यायला हवंस !

श्रीकृष्ण : आपापल्या परीनं प्रत्येकजण विचार करतोच ! तू सुध्दा गहन किंवा उथळ आहेसच ! जे आहे त्यालाच गहन किंवा उथळ म्हणावं लागतं !

निशा : बरं काय ठरलं मग तुझं ? मी काही एखाद्या वाईट गोष्टीचा आग्रह धरत नाहीय --

श्रीकृष्ण : आता हा विषय पुन्हा काढला म्हणजे माझ्या डोक्यातलं व्दंव्द बाजूला ठेवावं लागणार--

निशा : लग्नाच्या वेळी आपण समसमान शिकलेले होतो -- काही प्रॉब्लेम नव्हता --

श्रीकृष्ण : नंतर तू आणखी शिकायचं म्हणालीस तर मीच तुला प्रोत्साहन दिलं !

निशा : संसार सांभाळून मी अभ्यास केला ! आता मी जास्त शिकलेली आणि तू कमी शिकलेली हे मला अपमानास्पद वाटतं !

श्रीकृष्ण : आता पन्नाशीला आलो ! अभ्यास बंद करून कितीतरी वर्षं लोटली !

निशा : मी कसं केलं ? नुसतं वर्तमानपत्रांच्या घड्यांचं बोलत नाहीय मी - क्वालिफिकेशन वाढवायचं बोलतीय !

श्रीकृष्ण : माझी इच्छा नाही -- मला जमणार नाही -- माझं डोकं खाऊ नकोस -- आय म नॉट इंटरेस्टेड -- आणि बरं चाललंय !

निशा : अरे पण बरं चाललं तरी क्वालिफिकेशन वाढणं चांगलं नाही का !

श्रीकृष्ण : मला गरज नाही.

निशा : मी डबलग्रॅज्युएट आणि तू फक्त ग्रॅज्युएट हे अपमानास्पद वाटतं मला !

श्रीकृष्ण : म्हणून तू माझ्यात सामाजिक क्रांती करणार !

निशा : पण मी काही वाईट सांगतेय का ?

श्रीकृष्ण : अरे हो, चांगलं पुष्कळ आहे पण ते काय सगळं मी करत बसू का ? आणि सध्या हे सगळे विषय बंद ठेव. तू आल्यावर मी माझ्या डोक्यातले प्रश्न बाजूला ठेवतो. सध्या बाहेर दंगल चालू आहे. कर्फ्यू आहे बाहेर. आणि याला एकत्रितपणे तोंड द्यायचं आहे. आपल्यात सारखं व्द्वंव्द नको.

निशा : नाव श्रीकृष्ण आणि व्द्वंव्दाची चिंता.( जाऊन तांदळाचं ताट ठेवून येते.)

श्रीकृष्ण : त्या श्रीकृष्णामुळं मला आयुष्यभर सगळे प्रॉब्लेम्सच झालेत ! तो खरा होता की कविकल्पनेनं निर्माण केलेलं ते एक पात्र होतं, कोण जाणे ! पण मी मात्र पिडला गेलोय त्याच्यामुळं ! ते नाव तर मला ठेवलं गेलंय आणि त्याच्या कुठल्याच क्वालिटीज माझ्यात नाहीत ! (जाऊन त्या जखमी व्यक्तीपुढे उभा राहून -- ) तू असाच राहणार का ? सतत जखमी ? तुला काय झालंय ? काय हवंय तुला ? तुझ्या या अवस्थेवर काही उपाय आहे की नाही ? बाहेर दंगल चाललीय, आत तू हा असा ! सगळीकडनंच सगळं असं संघर्षमय का ? आणि असंच जर आहे तर आम्ही संघर्षमय जगलो - असं सांगण्यात तरी काय अर्थ आहे ? दुसरं कसं जगू शकणार होतो ?

निशा: याला मुळात संघर्षमय म्हणतच नाहीत. संघर्षमय म्हणजे शरीराला इजा होणं किंवा मृत्यू येणं असे धोके हवेत. पोलिसांना दिसतील असे धोके हवेत. मानसिक गोंधळात जगण्यात कसलं आलंय शौर्य? अशांनी संघर्षाचं नावच काढू नये.

श्रीकृष्ण : निशा, बाहेर चाललेली दंगल कुणाच्यातरी विरुध्द आहे ना ? त्याचा त्रास आपल्यालाही होतोय ना ?

निशा : संघर्ष ते करतायत, आपण नाही. गोळीबारात किंवा भोसकाभोसकीत मरण्याचे धोके त्यांना आहेत. समूहाच्या प्रश्नासाठी लढतायत ते !

श्रीकृष्ण : नुसतं स्वत:चं क्वालिफिकेशन वाढवून किरकोळ यशस्वी होण्यासाठी नव्हे ! ( आत जातो. )

निशा : हे बोलणं महागात पडेल तुला ! स्वत: काहीतरी कर आणि मग बोल नं ! क्वालिफिकेशनही वाढवायचं नाही आणि लढाही नाही - याचा काय उपयोग ? समूहाचे म्हणावेत असे प्रश्न आहेत कुठं आपल्याला ? उगीच काहीतरी कशाला बोलायचं ?

श्रीकृष्ण : ( आतूनच -- ) असे प्रश्न आपल्या वाट्याला आले की आपणही युनियनचे सभासद होऊन लढे देतोच की !

निशा : जमेल तेवढे - कातडी बचाऊ लढे !

श्रीकृष्ण: : ( आतूनच --) आपण एकमेकांच्या विरुध्द तरी बोलतोय का हाच आता मला डाऊट वाटतोय !

निशा : ( जखमी व्यक्तीपुढे -- ) कसल्या जखमा झाल्यायत बाई तुला ? वर्षानुवर्षं नुसती अशीच राहिलीयस --

काही उपाय आहे की नाही याच्यावर ? बरी होणारच नाहीस का तू कधी ? अं ? अन्न संपत आलंय. बाहेर पडायची सोय नाही. सगळं बंद आहे. मुलं इथं नाहीत. तिकडं आणि कसं चाललंय काय माहीत ! सगळं नीट आहे असं कधी होणार आहे की नाही ? तुझीसुध्दा अशीच सवय झालीय आता -- तू अचानक  बरी तर नाही ना होणार ? बाप रे ! असं नको हं व्हायला ! मग ओळखताच येणार नाही आपल्याला एकमेकांना ! हे असंच बरं आहे ! असह्य असलं तरी ! असह्य !

( हातांनी ओवाळत -- )

जय देवी जय देवी जय जखमीबाई --

-- हं बरं वाटतंय नं ? स्त्रीचं दु:ख स्त्रीलाच कळणार बाई ! ( श्रीकृष्ण येतो.)

श्रीकृष्ण : जय देव जय देव जय जखमीबाबा !

( हातांनी भराभरा ओवाळतो. ) पुरुषाची दु:खं महत्त्वाची नाहीत ?

निशा : तू नेहमी स्वत:च्या जखमीपणाचं स्तोम माजवतोस !

श्रीकृष्ण : आपसात संघर्ष नकोय -- ( जरा त्रासतो. पण पसारा आवरायला लागतो -- )

निशा : म्हणजे खरे शत्रू वेगळेच आहेत असं तुझं म्हणणं !? आपण नाही ?

श्रीकृष्ण : खरं तर शत्रू कोण हेच नाहीत नाही. शत्रू माहीत असल्याशिवाय काय चाललाय हा सगळा गोंधळ ? शत्रू माहीत पाहिजे. त्याशिवाय एकत्र कसं राहता येईल ? -- आपल्याला ?

निशा : का आणि कशासाठी हेही माहिती नको ?

श्रीकृष्ण : बीबीसीवर मी एका सैनिकाची मुलाखत पाहिली. त्याच्या शरीरावर त्र्याहत्तर ऑपरेशन्स झालेली आहेत ! एवढा अनुभवी मनुष्य काय म्हणाला ? -- ‘ कुणाच्याही बाजूनं असो -- कोणत्याही कारणानं असो -- लढणारा माणूस हा नेहमी आदरणीयच असतो ! माझा शत्रू सैनिकही मला आदरणीयच वाटतो ! ‘

निशा : बरोबर काय आणि योग्य काय हे कळू शकत नाही -- हाच त्याच्या म्हणण्याचा अर्थ !

श्रीकृष्ण : निदान शत्रू तरी माहीत पाहिजे !

निशा : शत्रू माहीतच नसण्याला तू घाबरतोयस !

श्रीकृष्ण : मी कितीही भित्रा असलो तरी मी खून तर करत नाही ना कुणाचे ?

निशा : पण हे तरी चांगलं का वाईट हे कुठं माहीत आहे ! नुसतं सहन करणाऱ्यांना बुळचट म्हणतात !

श्रीकृष्ण : आपलं मनुष्यबळही बघावं लागणार नं ! उगीच आपलं चार लोकांनी दंगल करून कसं चालेल ?।

निशा : मनुष्यबळसुध्दा एका पायावर एकत्र येणाऱ्यांचं हवं. जास्त विचार नको. सगळयांना कॉमन असा एखादा अन्याय जाणवण्याइतपत विचार पुरे. बाकी क्शन ! खून, जाळपोळ, भोसकाभोसकी, दगडफेक -- अशी !

श्रीकृष्ण : मी हे कधीच करणार नाही. ( बसतो. पुन्हा सिगरेट. )

निशा : मग दुसरे देश -- दुसरे समूह माजतील. तुझी भूमी, तुझे अधिकार गिळंकृत करतील. दुसरे धर्म माजतील. तुझी प्रार्थनास्थळं उद्ध्वस्त होतील. दुसरी माणसं उन्मत्त होतील. तुझ्यावर अत्याचार करतील.

श्रीकृष्ण : सगळेच आदरणीय !

निशा : आपल्याला लढलंच पाहिजे -- एवढंच बघायचं !

श्रीकृष्ण : मला संघर्ष आवडत नाही - तू तरी कुठं मला न्यायाची ट्रीटमेंट देतेयस ?

निशा : मी ?

श्रीकृष्ण : तरी तुला खतम केलंय मी ? केलंय ?

निशा : हा पळपुटेपणा आहे. एक अन्याय नक्की करून त्याविरुध्द लढा द्यायच्या ऐवजी -- सगळे दु:खीच असतात -- अशा अध्यात्मिक पातळीवरनं पळापळ करतोयस तू ! तुला विशिष्ट असा लढा नकोय !

श्रीकृष्ण : हं ! मला नुसताच थकवा वाटतो ! झालं समाधान ? ।

निशा : काही न करण्यानंसुध्दा थकवा येतोच ! -- रामण्णा येईल थोड्या वेळात. सुगावकर महाराजांच्या भक्तीमुळं तेवढं एक बरं झालंय. ती मठातली ओळख अशी उपयोगी पडेल असं कधी वाटलंही नव्हतं. त्याला आता स्टोव्ह, पिन, रॉकेल, कणीक आणि काही कडधान्यं आणून द्यायला सांगते. देईल तो आणून. महाराजांवर श्रध्दा आहे त्याची.

श्रीकृष्ण : आपल्यासाठी धोका पत्करतो तो.

निशा : महाराजांच्या भक्तांसाठी ! महाराजांच्या भक्तीमुळंच ही मदत मिळते आपल्याला !

श्रीकृष्ण : याच्यावर मी काय बोलणार ?

निशा : नाहीच बोलू शकणार ! इकडं तर तुझी भक्तीवर श्रध्दा आहे आणि इकडं तर तुला सगळं सिध्दही करून लागतं !

श्रीकृष्ण : हे नुसतंच असं संपेल असं मला वाटत नाही -- काहीतरी वाईट घडेल असं वाटतं !

निशा : झटकून टाकायला हवं हे सगळं !

श्रीकृष्ण : कधीकधी वाटतं की आपणही यादवीला तयार व्हावं ! मेलो तर मेलो !

निशा : वेडा आहेस -- ज्यांना वर्चस्व गाजवायचं असतं ते दुसऱ्यांना असं संपूर्ण ठार करत नाहीत. जखमी करतात. कमकुवत करतात. शिवाय मानवी हक्कांचं बोलत राहतात.

श्रीकृष्ण : खरं तर सगळयांना सरळ, साधं जगणं शक्य आहे. कुणी बिघडवलंय हे सगळं ?

निशा : रामण्णा येईल बहुतेक. काल तो म्हणत होता की सरकार नमतं घ्यायला तयार आहे. दंगल शमेल सुध्दा !

श्रीकृष्ण : दंगल शमली तर कुणाचे तरी हक्क हिरावून घेऊन संपेल !

निशा : किंवा न्याय्य हक्क मिळवून असं म्हणावं लागेल !

श्रीकृष्ण : म्हणजे तेच ! बाहेर दंगल आणि आत भीती असं चाललंय गेली कित्येक वर्षं ! माझं डोकंही दुखतंय !

निशा : मी बाम लावून देईन !

श्रीकृष्ण : मला तर काही मार्गच दिसत नाही.

निशा : असंच्या असं तर हे टिकणार नाही म्हणा - बदल होईलच -- ( अचानक बाहेर दंगलखोरांच्या आरोळया. बरीच माणसे ओरडत गेल्याचे आवाज. दोघेही स्तब्ध. आवाज लांब जात नाहीसे होतात. शांतता. )

श्रीकृष्ण : बाम लावतेयस ना ?

निशा : हो. ( दारावर थापा पडतात. निशाचा चेहरा उजळतो -- ) रामण्णाच ! ( दाराकडे जाते -- )

श्रीकृष्ण : थांब ! नीट विचार आधी ! रामण्णाच कशावरून ?

निशा : ( दाराजवळ -- ) रामण्णा का ?

( बाहेरून करडा आवाज --'रामण्णाबिमण्णा कुणी नाही. दार उघडा. नाहीतर घर पेटवून देईन -- खलास करून टाकीन ! ' निशा श्रीकृष्णकडे पाहते. )

श्रीकृष्ण : उघड -- ( काही क्षणांनी -- ) उघड दार -- नाहीतरी -- ( ती क्षणभर पाहते. मग दार उघडते. सुमारे पंचवीसचा माणूस आत येतो. मळके कपडे, दाढी थोडी वाढलेली, निग्रही चेहरा. आत आल्यावर दार लावतो. त्या दोघांकडे पाहात काही क्षण उभा राहतो. ती दोघे स्तब्ध. तो अंदाज घेतोय. त्याच्या पायाला लागलेले असून तो थोडा लंगडतोय. मधेच वेदना. )

तो : दारं बंद करून घेतली म्हणजे बाहेरच्या जगाशी आपला संबंध संपला ! नाही का ! विसरा ते आता ! आता बाहेरचं जग मुसंडी मारून आत येईल ! ( दोघेही गप्प. ) दारं लावतायत ! -- अजून कुणी आहे काय -- आत ?

श्रीकृष्ण : नाही. आम्ही दोघच आहोत.

निशा : आमची मुलं इथं नसतात.

तो : हालचाल बंद ! बाहेर पडलात तर मराल. ओरडलात तर इथंच मराल ! आणि येणार कोण ? ( बघतो. लंगडत आत जातो. काही क्षणांनी बाहेर येतो. )

निशा : खरच, कुणीच नाही, आमच्याशिवाय.

तो : पायाला गोळी लागून गेलीय. पोलीसांची. पळापळ झाली. आ-ह्--! थोडा वेळ थांबणार आहे मी इथं -- काही हरकत ?

श्रीकृष्ण : काही नाही.

निशा : ( रक्त पाहून -- ) बांधायला देऊ काही ? ( तो काही बोलत नाही. ती आत जाऊन मलम आणि एक फडके आणते. त्याच्याजवळ देते. तो मलम फासतो आणि ते फडके बांधतो. )

तो : हां ! हा सगळा तुमचा दयाळूपणा वगैरे काही समजू नका ! कारण मी तुमच्याबद्दल कधीच तशी भावना बाळगणार नाही ! सहानुभूतीची ! ( क्षणभरानं,जखमी व्यक्तीकडे लक्ष जाऊन--) आमचा देव इथं कसा ? जय देवा !

श्रीकृष्ण : आमचाही तोच आहे देव !

निशा : ती देवी आहे. बोलत नाही.

तो : हं ! ( रिपीट करत -- ) बोलत नाही ! ( बसत -- ) तुम्ही स्टॅबिलिटी असलेली माणसं ! आम्ही स्टॅबिलिटी नसलेली ! तुम्ही अन्याय करणारे ! आम्ही सहन करणारे ! नाही का !

श्रीकृष्ण : असं कुठं काय म्हणतोय आम्ही !

तो : मी म्हणतोय ना, मी म्हटलं नाही तर तुम्हाला कळायची गरजच काय ? ( दरडावत -- ) काय ? बरोबर की नाही ?

श्रीकृष्ण : बरोबर असेलच -

तो : आ ऽ ह् -- ( खिशातून पिस्तूल काढून दाखवत -- मूकाभिनय -- ) पिस्तूल ! बघितलं काय ? ( पुन्हा खिशात ठेवतो. ) टोकावर आलेला भेजा आहे आपला ! आणि बाहेर कर्फ्यू आहे !

श्रीकृष्ण : हो.

तो : शांत रहा -- कळलं काय --

श्रीकृष्ण : हो --

तो : ( वेदनेनं -- ) आह -- ( क्षणभरानं -- ) चहा पाहिजे । -- ( निशा श्रीकृष्णाकडे पाहते. )

श्रीकृष्ण : मिळेल ना, मिळेल ! ( निशा आत जाते. )

तो : मिळायलाच पायजे ! मिळायलाच पायजे ! ( खुर्चीतच डोळे मिटून रिलॅक्स होत --) तुम्ही जबाबदार ! अं ! आणि आम्ही काय बेजबाबदार !? आम्हाला बायकापोरं नसतात ? ती बिनमहत्त्वाची -- नाही का ? तुम्हाला स्थिरता आवडते -- आणि आम्हाला काय अ -- स्थि -- र -- ता -- ? ( त्याला डुलकी लागते. )

श्रीकृष्ण : ... खरं तर आपण ओळखतही नाही एकमेकांना. पण आपण एकमेकांचे शत्रू आहोत असं तुमच्या बोलण्यावरून दिसतंय -- आमची मुलं यशस्वी व्हायला हवीत -- तशीच तुमचीही यशस्वी व्हायला हवीत. प्रश्नच नाही. पण मग भांडण कुठं आहे ? आणि सगळेच सारखेच यशस्वी कसे होतील ? तुम्हाला वाटतं की आम्ही आमचं कल्चर तुमच्या माथी मारतो -- तुम्ही असं म्हणत असता हे मला माहीत आहे -- मग उलटं करा -- तुमचं कल्चर आमच्या माथी मारा. ते सध्या जमत नाही म्हणून

निराश होऊ नका. जमेल ! आमच्याकडून काय काय घडत गेलं ते तुम्ही लक्षात ठेवलंय ! वाईटच होतं ते ! आणि ती स्मृतीच तुमची आता हे स्फोट घडवतेय ! ( निशा चहा घेऊन येते -- मूकाभिनय. )-- हं -- ठेव समोर -- हं -- चहा घ्या-- चहा घेताय नं -- ( त्याला झोप लागलेली आहे. ) -- ठीक आहे -- ठेव तिथं -- थकलाय तो --

निशा : झोप लागली असेल ?

श्रीकृष्ण : थकलेला दिसतोय.

निशा : म्हणजे --

तो : ( एकदम दचकून उभा राहात -- ) काय करत होता ? मला मारायचा विचार ?

निशा : नाही, नाही --

तो : चहा कुठाय ?

निशा : हा काय --

तो : हं ऽ ( चहा घेतो.) जेव्हा धार्मिक दंगली होतील तेव्हा प्रश्न येणार नाही. तेव्हा अपण एका बाजूला असू !

श्रीकृष्ण : म्हणजे सध्याच्या दंगलीतनं वाचलेले !

तो : आमच्या लोकांची बाजू वेगळी आहे. आम्हाला न्याय पायजे. फार वर्षं आम्ही अन्याय सहन केला. आता नाही चालणार.

श्रीकृष्ण : आम्हालाही कधीकधी असंच वाटतं .

तो : का ? तुम्हाला काय झालंय ? आणि जरी काहीही वाटलं तरी उपयोग नाही. तुमच्यात ताकद नाही.

निशा : मघाशी मी एक तुम्हाला सांगायचं विसरले. आमच्याकडे रामण्णा नावाचा एक माणूस येतो. तो एक येऊ शकेल.

तो : येऊ द्या ! -- ( बेफिकिरी आणि गुर्मी. )

श्रीकृष्ण : सगळयांना न्याय मिळालेला आहे असा काळ कधी येणार कोण जाणे !

तो : ताकद नाही तुमच्यात. एक दिवस असा येईल की तुमच्या बायका आमच्याकडे भांडी घासायला येतील.

निशा : एवढा हिंसकपणा का करताय ?

तो : पाच वर्षांपूर्वी आम्ही मोर्चे काढत होतो, निवेदन देत होतो, कुणी विचार केला ? नाही ! न्याय मागण्याचे अशक्त प्रकार होते ते ! न्याय, मानवी हक्क हे सगळं हिसकावून घ्यावं लागतं. आपोआप मिळत नाही. आणि आपल्याला पाहिजे ते मिळवताना दुसऱ्याचा विचार कामाचा नाही. तुम्ही आमच्याबद्दल बेफिकीर असाल तर त्याच्यावर उपाय म्हणजे आम्ही तुमच्याबद्दल बेफिकीर होणं -- हाच !

श्रीकृष्ण : काय साध्य होईल याच्यातून ?

तो : तुमची स्टॅबिलिटी धोक्यात येईल. तुमची सुखं धोक्यात येतील. ती आम्हाला हवी आहेत. तुम्ही कमी

दर्जाचे असं व्हायला हवंय. आणि आम्ही जेव्हा स्थिर होऊ तेव्हा आम्हाला इतका धोका नाही. कारण तुमची संख्या कमी आहे. शिवाय तुमच्यात लढाऊपणा नाही.

श्रीकृष्ण : म्हणजे तुमच्यात लढाऊपणा नव्हता तेव्हा जे घडलं ते बरोबरच होतं तर !

तो : बरोबर-चूकचा प्रश्न नाही. तुम्ही तुमचे स्वार्थ साधलेत. आता आम्ही आमचे साधणार. संघर्षाशिवाय जगण्यानं काय होतं ते आम्ही अनुभवलेलं आहें. संघर्ष केला नाही तर तुम्ही क:पदार्थ होता. जसे तुम्ही आता होणार आहात.

श्रीकृष्ण : आव्हान देताय ! उगीचच !

तो : होय ! पिस्तूल आहे खिशात ! तुम्ही आम्हाला विचारांनी मारलंत, आम्ही सरळ गोळयाच घालू !

श्रीकृष्ण : तुमच्या भाषणांत, वाङ्.मयात तर समता, बंधुत्व, न्याय -- अशी तत्त्वं असतात !

तो : ( संतापून ओरडत -- ) आमच्यासाठी ! आमच्यासाठी असतात ती ! सगळं जग, एका वेळी, कुणाच्याच नजरेपुढं येऊ शकत नाही ! दिसेल तेवढंच बघतो -- कुणीही ! ( काही क्षणांनी हळूहळू नॉर्मल होत -- ) स्थिर आयुष्याचे भयभीत भोक्ते ... आहात...तुम्ही...

श्रीकृष्ण : जे तुम्हाला व्हायचंय --

तो : भयभीत भोक्ते...भयभीत...! ( बोलता बोलता थोडी गुंगी येते. बसल्याबसल्या झोपी जातो. )

निशा : झोपला तो ! ( जाऊन धुण्याची बादली आणि कपडे वाळत टाकायची काठी घेऊन येते – हाही अर्थातच मूकाभिनय. )!

श्रीकृष्ण : तो जरी सध्या आपला शत्रू असला तरी देशाच्या संरक्षणाला, धर्माच्या संरक्षणाला आपण एकत्र असणार आहोत ।

निशा : भोगा मग त्याची फळं ! ( मूकाभिनायाने -- कपडा झटकून वाळत टाकू लागते. पुढे हे चालू -- )

श्रीकृष्ण : मग काय करावं असं तुझं म्हणणं आहे.

निशा : श्रीकृष्णानं सल्ला द्यायचा असतो. मागायचा नसतो !

श्रीकृष्ण : मला वाटतं, सगळयांनी सारखं निरनिराळया कारणांनी एकमेकांवर हल्ले करत राहावं -- कधी आक्रमणासाठी तर कधी संरक्षणासाठी -- आणि आयुष्यं सारखी धोक्यात घालत संघर्षमय जगावं -- म्हणजे काहीजण बुळचट, काहीजण शूर, लढाऊ -- असं होणार नाही. सगळेच लढाऊ ! मरायला, मारायला तयार ! हेच आपल कल्चर व्हायला हवंय ! सतत संतप्त ।

निशा : असं जर नाही झालं. तर आग्रही, हट्टी, अतिरेकी अशा स्वार्थी लोकांचं फावत राहील. सगळयांनी एकमेकांना खलास करायची तयारी ठेवलीच पाहिजे.

श्रीकृष्ण : म्हणजे काय -- अंकुश राहतील ? का काय होईल ? की नम्र होतील सगळे ? संघर्ष वाईट, हिंसा वाईट -- हे नुसतं म्हणतो आपण -- असं माणुसकीची भावना मनात दाटवून ! आपल्याला यातून फक्त

एवढंच म्हणायचं असतं की या वाईट गोष्टींना मी जबाबदार नाही ! ते दुसरे कुणीतरी आहेत -- अपक्व लोक ! सगळयांना न्यायानं -- आनंदानं जगणं शक्य आहे -- असं आपल्याला समजतं -- असा सुप्त गर्व असतो यांच्यात ! मुळात समजत तर काही नाही !

निशा : शेवटी निराशावादच विजयी होईल !

श्रीकृष्ण : किंवा लहानलहान तुकड्यांचे आशावाद विजयी होतील ! दैववाद श्रेष्ठ की प्रयत्नवाद श्रेष्ठ ?

निशा : आपल्याला स्थिरतेची सवय झालीय. आपले चांगले, कल्चर्ड, न्यायाचे, त्यागाचे विचार हे त्या स्थिरतेचेच द्योतक आहेत. आपली स्थिरताच या गप्पा मारते. तो म्हणतो ते बरोबर आहे.

श्रीकृष्ण : सध्याची ही घटना गेली काही वर्षं सतत चालू आहे की हीच घटना सारखी वारंवार घडतेच तेच कळत नाही.

निशा : माझीही तीच अवस्था आहे. वर्षानुवर्षं ! इलाज नाही !

श्रीकृष्ण : मग आत्ता, या क्षणी काय करायला हवंय ?

निशा : एकामुळं दुसऱ्याची अवस्था वाईट होतेय !

श्रीकृष्ण : आपण तरी कुठं स्थिर आहोत ?

निशा : शिक्षण होणं, वेळेवर औषधं मिळणं, नोकऱ्या मिळणं, श्रीमंत होत राहणं -- हे ज्यांचं होत राहतं ते स्थिर ! सुखसमृध्दीचे जास्त मार्ग आपल्याला उपलब्ध आहेत ! ( रिकामी बादली, काठी आत ठेवून येते. -- मूकाभिनय . )

श्रीकृष्ण : म्हणजे आपली बाजू ही विरुध्द बाजू असंच हे राहणार आहे ! ( क्षणभरानं -- ) मग आपणही याला --

निशा : हो.

श्रीकृष्ण : ठार करायचं ?

निशा : हो.

श्रीकृष्ण : हिंसक व्हायचं ? आपण ? हिंसक ?

निशा : हिंसक आहोतच आपण -- त्यामुळंच तर आपण एवढी वर्षं, पिढ्यान् पिढ्या त्यांना लुटत आलो !

श्रीकृष्ण : हिंसेपेक्षा माघार घेण्याची काही पध्दत काढू या !

निशा : मग ती नुसती माघार होणार नाही ! तुम्ही मागे ढकलले जाल ! रेटले जाल ! पाडले जाल !

श्रीकृष्ण : आणि हे कृतीचं स्वातंत्र्य !

निशा : खून करावेच लागतील, नाहीतर तुम्ही मारले जाल.

श्रीकृष्ण : त्यापेक्षा दोघांचाही तिसरा कुणी कॉमन शत्रू मिळाला तर दोघांना एक होता येईल ! धार्मिक किंवा भाषिक असं काही काढू या ! जमेल !

निशा : सगळंच एकत्रितपणे --सतत चालु राहू शकतं ! तेही आणि हेही ! आपणच शत्रू आणि

आपणच मित्रही !

एखाद्याला आपण वाचवलं तरी बरोबर, मारलं तरी बरोबर ! जे घडेल ते घडेल ।

श्रीकृष्ण : नाहीतर मग ही लढाई आपल्या शक्तीच्या क्षेत्रात आणायची -- इलेक्ट्रानिक्समधलं याला काही कळत नाही -- मानसशास्त्र किंवा कला यांच्यातलं याला काही समजत नाही.

निशा : ज्ञानाची क्षेत्रं ही आपली शस्त्रं आहेत हे त्यांना माहीत आहे.

श्रीकृष्ण : सगळी शस्त्रचं झालीयत !

निशा : आणि तू म्हणतोयस, हिंसा नको !

श्रीकृष्ण : झोपलाय तो.

निशा : तो स्वप्नात असेल.

श्रीकृष्ण : आणि आपण त्याच्या मृत्यूचा डाव आखतोय !

निशा : ( तंद्रीत असल्याप्रमाणे -- ) आहे असं त्यांना झुंजत राहू द्यावं आणि दरम्यान आपली जगण्याची वेगळीच क्षेत्रं आपण तयार करावी ! म्हणजे पुन्हा आपणच ज्ञानी !

श्रीकृष्ण : आपला मृत्यू फारसा अर्थपूर्ण असणार नाहीय हे समजून घेतलं तर जगणं जरा सोपं पडेल !

निशा : ( भानावर येत -- ) मुळात आता आपलं जगून पूर्ण झालं असं आपल्याला वाटल्यानंतरच मृत्यू येईल असंही नाही !

श्रीकृष्ण : साम्यवादाचा अभ्यास केलेले किंवा चारी धाम यात्रा केलेले सगळेच भरकटत असतात !

निशा : आरोग्यासाठी योग तर सगळयांना शक्य आहे ना ! तेवढ्यानं एक चांगली सुरुवात तरी होईल !

श्रीकृष्ण : टी.एस .एलियटच्या कविता आणि पिरांदेल्लोची नाटकं वाचून मला एक प्रगल्भ दृष्टिकोण आला.

निशा : आणि तुकारामाचं अभंग ?

श्रीकृष्ण : हो. तेही ! चांगलं, अत्युच्च दर्जाचं, भरपूर संगीतही ऐकलंय आपण ! धुंदपणे !

निशा : उपयोग काय पण ? कशालाही तोंड द्यायला मन तयार व्हायला हवं होतं. तसं कुठं झालंय ?

श्रीकृष्ण : बॉडीसुध्दा काही फारशी कणखर झाली नाही.

निशा : वेगवेगळया अँगल्सनी मन सशक्त असलं की यांच्या नको नादी लागायला असं होतं !— आपल्याला काही ते साधलं नाही !

श्रीकृष्ण : मन भितंय असं कधी होतच नाही -- आणि सतत विजयाचा आत्मविश्वास -- असं हवं होतं !

निशा : मी फुलांची प्रदर्शनं पाहात फिरायचे तो सगळा वेळ वाया गेला असं वाटतं मला --

श्रीकृष्ण : भगवद्गीतेतला श्रीकृष्ण मात्र भारीच हं ! रिअली ! त्याला बाहेरचं काही चिकटतच नव्हतं ! पण त्याची गोष्ट वेगळी आहे म्हणा ! देव होता तो ! म्हणजे असावा !

निशा : आपण देव नाही हे एकदा ठरलं की झालं !

श्रीकृष्ण : आपण गेल्यानंतर इथं जे घडेल त्याची आपल्याला काहीच माहिती कळणार नाही आणि आपला त्यात कसलाही सहभाग असणार नाही आणि ही काही फारशी महत्त्वाची बाब असणार नाही -- एवढं सरळपणे समजून घेता आलं तर मग प्रश्न येणार नाही !

निशा : पुन्हा गहनपणाचा प्रयत्न ! उपयोग काय त्याचा ?

श्रीकृष्ण : ( अचानक उद्रेकमय होत -- ) आता काहीतरी करावंच लागेल -- आलोच ! ( आत जातो. काही क्षणांनी बाहेर येतो. हातात सुरी -- मूकाभिनय -- निशा पाहते आहे -- ) सुरीच आता । हाच उपाय ! याला असा झोपेत नाही मारणार -- असा सुरी याच्या गळयाजवळ धरून उभा राहणार -- आणि जागा झाला की मग मारणार -- याला कळलं पाहिजे की आता आम्हीही उभे राहतोय -- आता आम्हालाही पर्वा नाही -- (मूकाभिनयाने --सुरी त्याच्या गळयासमोर धरून उभा--) अशा वेळी त्याच्या मस्तीचं काय होतं ते पाहू --

निशा : तो सरळ निघूनही जाणार असेल --

श्रीकृष्ण : पण त्यांचं आंदोलन आपल्याविरुध्द आहे -- आपण त्यांचे शत्रू आहोत -- आपणही संधी सोडून चालणार नाही -- नुसताच आपलाच नाश होण्यापेक्षा जमेल तेवढा त्यांचाही नाश करू --

निशा : अहो, महाशय, शुक् शुक् -- ( त्याच्या खांद्यावर थापट मारते. तो डोळे उघडतो. ) हलु नका -- तुमच्या गळयाजवळ सुरी धरलेली आहे -- हललात तर लगेच --

तो : वेदनेनं मला ग्लानी आली -- या माझ्या कमकुवत परिस्थितीचा तुम्ही फायदा घेताय --

श्रीकृष्ण : तसाच घ्यायचा असतो आळीपाळीनं --

तो : पण आम्हाला जगणं मुश्किल कुणी केलंय ?

निशा : हे सगळं चुकलंय तुझं श्री -- आता त्याला मारावंच लागेल -- आता सोडलं तर तो आपल्याला सोडणार नाही -- सुरी आणयलाच नको होती --

श्रीकृष्ण : ओघाओघात आता घडलं ते घडलं -- आता माघार नाही --

तो : पण मी तुम्हाला वचन देतो -- मी काहीही करणार नाही -- आपला देव एक आहे -- तुम्ही जखमी -- मी जखमी -- आपला देव जखमी -- आपण --

निशा : पण आपल्यात वितुष्ट आहे --

तो : आपल्यात वितुष्ट आहे -- आपल्याला काही कळत नाही -- आपण ओघाओघात वागणारे आहोत -- आपण एकमेकांना खलास करू इच्छितो -- हे सगळं आपलं कॉमन आहे -- आपण स्पर्धा करणारे, जास्त मिळवणारे, यशस्वी होणारे आहोत -- आपल्याला रिझल्टस् हवेत -- आपल्याला शेवट गोड हवा -- आपण नायक ! -- आपण केंद्र ! -- आपले विजय ! -- आपणच भव्य, दिव्य, उदात्त ! — आपल्या ध्येयांसाठी आणि आदर्शांसाठी प्राणार्पण करायला तयार असणारे ! -- आपल्याला पराभूत

व्हायचं नाहीय --मूल्यांची प्रस्थापना करणारे आहोत आपण -- आपण कुणाचे ना कुणाचे शत्रू आहोत – कुणाच्यातरी आड येणारे आहोत -- हे कॉमन आहे आपलं -- दुसऱ्याचे हेतू आपल्याला शुध्द वाटत नाहीत – दुसरे लोक स्वार्थासाठी काहीही करतायत असं वाटतं आपल्याला -- माणसाला माणूस म्हणून जगणं दुसरे अवघड करतायत असं वाटतं आपल्याला -- हे सगळं कॉमन आहे आपलं -- आपल्या दृष्टीनं महत्त्वाचं असं अजून घडायचं बाकी आहे -- आपण त्याच्यासाठी उत्सुक आहोत -- अधीर आहोत -- नाही ?

निशा : ते सगळं बरोबर असलं तरी शत्रू आहोत आपण एकमेकांचे -- श्री, सुरी तशीच ठेव -- आता सोडून चालणार नाही --

तो : आपल्याला एकत्र येता येईल असा एखादा शत्रू ठरवता येईल आपल्याला -- आपण एकत्र आलो तर फार प्रचंड शक्ती तयार होईल -- आपण शांतता नांदवू -- सगळीकडे -- शांतता -- ( दारावर थापा पडतात -- )

निशा : रामण्णा ! रामण्णाच ! ( दाराकडे जाते. बाहेरून ‘ ताई ऽ रामण्णा आलोय -- काही हवंय का -- ’ -- असे ऐकू येते -- ती दार उघडते -- ) या, या, रामण्णा ! या ! ( तो आत येतो. वय सुमारे ४०-४२. साधा माणूस. तो आत आल्यावर ती दार लावते. ) -- हा -- हा सापडालाय आमच्या तावडीत -- त्या दंगलखोरांमधला ! याला मारायचाय आता ! रामण्णा, बरं झालं ! तुम्ही त्याच्या खिशातलं पिस्तूल काढून घ्या ! चला ! चटकन !

रामण्णा : ( परिस्थिती समजून घेत -- ) बरं, तसं ! ( जाऊन त्याचे खिसे तपासून पिस्तूल काढून घेतो -- मूकाभिनय. ) -- हा इथं आत कसा आला ?

निशा : पायाला गोळी लागलीय त्याच्या ! द्या ते इकडे ! ( रामण्णा पिस्तूल तिच्या हातात देतो – मूकसभिनय. ) आता हा नि:शस्त्र आहे --

तो : मी एकोप्याचं बोलतोय !

रामण्णा : नि:शस्त्र माणसाच्या एकोप्याला कोणी किंमत देत नाही बाबा ! आता तू आणि मी सारखेच !

तो : हा माणूस आमच्या जातीचा आहे -- मला माहीत आहे --

श्रीकृष्ण : पण तो सुगावकर महाराजांचा भक्त आहे --

तो : रामण्णा, आपण एका जातीचे आहोत --

निशा : पण तो महाराजांना महत्त्व देईल. आम्हीही त्याच महाराजांचे भक्त आहोत.

तो : मुळात तो माझ्या जातीचा आहे. ( प्रेमानं -- ) रामण्णा !

श्रीकृष्ण : आता, आपण एकाच देशाचे आहोत असंही म्हणशील तू --

रामण्णा : ताई, महाराजांच्या आज्ञेनं मी हे काम करतो -- आपले चार लोक आहेत या भागात -- काही हवंय का ते सांगा --

निशा : महाराज तर कधीच वारले ! हं हं । महाराजांची आज्ञा । ( श्रीकृष्णाला -- ) अरे, आता सुरीची गरज नाही -- पिस्तूल आहे माझ्याकडे -- ( श्रीकृष्ण बाजूला होतो. )

तो : ( काकुळतीने -- ) रामण्णा !

रामण्णा : ( त्याला --) मी जास्त विचार करत नाही बाबा ! महाराजांच्यावर भरोसा टाकून गप राह्यलो म्हणून अनेकदा वाचलोय मी ! मी पैशाच्या अडचणीत सापडलो असताना माझी जमीन कमी किंमतीत लुबाडली गेली तेव्हाच वेडा झालो असतो ! काय करणार होतो मी ? । मी दीन होतो, दुबळा होतो ! तुटून गेलो असतो मी ! महाराजांच्यावर भरोसा टाकून गप राह्यलो !

तो : अरे, या पध्दतीनं तुला अन्याय सहन करायला शिकवलं त्यांनी ! आणि आता पुन्हा त्याच लोकांना मदत करतोयस तू ! हे त्यांचेच भाऊबंद आहेत !

रामण्णा : महाराजांच्यामुळं वाचलो मी ! त्यांची कृपा हवी, बास !

निशा : सगळेच कसेबसे वाचलेले आहेत ! सगळयांना काहीतरी घडायला हवंय !

श्रीकृष्ण : बुध्दीनं काढता येईल असं -- सर्वांना समाधान देईल असं -- एकच उत्तर याच्यावर काढता येईल असं वाटत नाही --

निशा : मग, आता, याच्यावर उपाय ?

श्रीकृष्ण : कशावर ? या एकूण अवस्थेवर ? उपाय असा लागेल की सगळे प्रश्न एकत्रितपणे एका क्षणात पाहता आले पाहिजेत ! आणि पाहताक्षणी ते नाहीसे झाले पाहिजेत !

तो : उपाय ?

रामण्णा : कसला उपाय ताई ? ( बाहेर लोकांच्या आरोळया. हळूहळू आवाज लांब जातात. निशा मूकाभिनयानं पिस्तूल जखमी व्यक्तीवर रोखते. )

निशा : -- उपाय -- हाच ! -- ( सगळे चकितपणे पाहताहेत. )

तो : म्हणजे आत्महत्या !

श्रीकृष्ण : सगळी मूल्यंच खलास करायची !

रामण्णा : जप करत राहा त्यापेक्षा ! ( ती निग्रहीपणे -- मूकाभिनयानं -- पिस्तूल रोखून उभी. डोळयांत वेडेपणाची झाक. जखमी व्यक्ती भयभीतपणे कापत राहते...)

-- पडदा पडत जातो --

--- ००० ---

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.
दूरध्वनी – २४२२७८४७ / ४८ आणि मो – ९३७१००५७७३.